ISSN–2277- 8721
EIIRJ
Electronic International Interdisciplinary Research Journal (EIIRJ)
Volume-X, Issues-III May - June 2021

# सहकार्यात्मक अध्ययन

अमरदीप अशोक रामराजे
सहाय्यक प्राध्यापक
मातोश्री शिक्षणशास्त्र महाविद्यालय, एकलहरे, नाशिक

सध्याची शिक्षणप्रणाली ही विद्यार्थी केंद्रित अशी शिक्षणप्रणाली आहे. कारण आजच्या काळात बालक हा समाजाचा महत्त्वाचा आधार आहे. त्याच्या विकासावरच समाजाची देशाची प्रगती अवलंबून आहे. बालकाचा विकास व त्याच्यावर होणारे संस्कार हे योग्य असतील तरच तो समाजाचा भविष्यातील योग्य नागरिक होवू शकतो देशाला त्याच्या मार्फत योग्य नेतृत्व मिळू शकते.

यासाठी आदर्श नागरिक तयार होण्यासाठी बालकावर कुटुंबासोबत, शाळेद्वारे योग्य संस्कार होणे तितकेच अपेक्षित आहे. यासाठी शाळेद्वारे बालकाला योग्य अध्ययन अनुभूती देण्याचा प्रयत्न केला जातो. परंतु हे संस्कार घडत असतांना कुठेतरी असे जाणवते की स्पर्धात्मक युगाला प्रारंभ झालेला दिसून येतो. त्यामुळे या स्पर्धात्मक वातावरणात असे होते की जे बालक हुशार, प्रतिभाशाली किंवा कोणतीही गोष्ट चटकण ग्रहण करत असेल तर त्याचा परिणाम म्हणजे अध्ययनाची ज्यांची गती कमी आहे असा गट मागे पडत चाललेला आहे तर एक विशिष्ट गट पुढे जातांना दिसतो. परंतु शिक्षणात अशा प्रकारचा फरक अपेक्षित नाही तर सर्व विद्यार्थ्यांनी शिक्षणाच्या माध्यमातून पुढे जाणे अपेक्षित आहे.

*Aarhat Publication & Aarhat Journals*is licensed Based on a work at*http://www.aarhat.com/eiirj/*

सद्य:स्थितीत शिक्षणाच्या साहाय्याने व्यक्तीच्या वर्तनात विकासात्मक बदल घडवून आणून समाजामध्येही विकासात्मक बदल घडवून आणणे शक्य आहे. या द्वारे व्यक्तीव्यक्तीमध्ये होणारी आंतरक्रिया परिणाम होईल, यासाठी शिक्षणाला मोठी जबाबदारी पार पाडावी लागेल.

अध्ययन अध्यापन पध्दतीत बदल करुन अध्ययन–अध्यापन पध्दती ही पारंपारिक पध्दतीपेक्षा वेगळया पध्दतीने राबविण्याचा प्रयत्न केला म्हणजे जिथे फक्त शिक्षक व विद्यार्थी या दोन घटकांमध्येच आंतरक्रिया होत असे तीथे शिक्षक–विद्यार्थी–विद्यार्थी अशी प्रक्रिया सुरु झाली तर त्याचाच निश्चितच गुणात्मक फरक जाणून येईल व स्पर्धात्मकतेचे काहिसे कमी होण्यास मदत होईल. विद्यार्थी आपल्या समवयस्क गटांमध्ये अध्ययनाचे काम एकमेकांच्या मदतीने सुरु करतील तेंव्हा ते एकमेकांची मते ऐकूण घेतील, ऐकमेकांबद्दल आदर बाळगतील व वर्गातील स्पर्धात्मक वातावरण नाहीसे होवून सहकार्यात्मक वातावरण वाढीस लागेल व सहजपणे प्रभावपूर्ण अशी लोकशाहीची वृत्ती त्यांच्यात निर्माण होईल व वर्गातील वातावरण हे लोकशाहीस पोषक असे तयार होईल.

ISSN–2277- 8721

EIIRJ

Electronic International Interdisciplinary Research Journal (EIIRJ)

Volume-X, Issues-III May - June 2021

## व्याख्या

स्लेविन १९९० – " सहकार्यात्मक अध्ययन ही एक प्रक्रिया असून यामध्ये विद्यार्थी गटामध्ये एकत्र येवून शिक्षकाने प्रारंभी सादर केलेल्या साहित्यावर काम करतात. "

" एखाद्या छोटया गटात जेव्हा विद्यार्थी स्वत:चे तसेच गटातील इतरांचे अधिकाधिक चांगल्या पध्दतीने अध्ययन व्हावे यासाठी धडपडतात तेव्हा त्यास सहकार्यात्मक अध्ययन असे म्हणतात. "

गटामध्ये वावरणा–या प्रत्येक विद्यार्थ्याची भावना ही आपुलकीची, आत्मीयतेची असणे आवश्यक आहे. गटातील कृती ही स्वत:साठी व गटातील इतरांसाठी ती लाभदायक असणे अशा

फलितांची अपेक्षा सहकार्यात्मक कृतीमधून पूर्ण व्हायला हवी व सर्वांनी मिळून त्यासाठी प्रयत्न करणे

आवश्यक आहे. स्वत:बरोबर इतरांचेही अध्ययन परिणामकारक होणे आवश्यक आहे.

वर्गामध्ये शिक्षकाचे अध्यापन झाल्यावर किंवा अध्यापन न करता वर्गातील विद्यार्थ्यांचे लहान–लहान गट करुन त्यांना पाठयक्रमावर आधारित कार्य नेमून द्यायचे आणि ते गटातील सर्व विद्यार्थ्यांना पूर्णपणे चांगले येईपर्यंत त्यांना एकत्रपणे काम करायला लावणे हे या सहकार्यात्मक अध्ययनात अपेक्षित आहे. प्रत्येकाच्या व्यक्तीगत श्रमातुन गटातील सर्वांचा त्याचा फायदा होतो. हे या सहकार्यात्मक अध्ययनातून साध्य होण्यास मदत होते. आपल्या सर्वांचे ध्येये त्यामागील उद्दिष्टे समान आहे. व ते सर्वांच्या सहकार्यातून साध्य होण्यास मदत ठरु शकतात हे सहकार्यात्मक अध्ययनात सर्व गटातील मुलांना माहित असते .

## महत्त्व

१. सहकार्यात्मक अध्ययनात विद्यार्थी आपल्या स्वत:च्या फायद्याबरोबर इतरांच्या फायद्याचा विचार करतो.

२. गटागटाने काम केल्याने त्याच्या एकमेकांच्या बाबतीत आपुलकीची भावना विकसित होते.

३. सहकार्याची भावना विद्यार्थ्यांमध्ये निर्माण होते.

४. एकमेकांच्या विचारांची देवाण घेवाण होत असल्याने, आपले विचार योग्य पध्दतीने मांडण्यास प्रवृत्त होतात.

५. एकमेकांच्या विचारांचा आदर करायला लागतात.

६. संघप्रवृत्ती निर्माण होते.

७. बंधुत्वाची भावणा वाढीस लागण्यास मदत होते.

८. नेतृत्वकौशल्य व विचार मांडण्याची पध्दती यांचा विकास होण्यास मदत होते.

९. न्यूनगंडाची भावना दूर होण्यास मदत होत असते.

१०. संवेदनशिलता व सौजन्यशिलता हे मूल्य रुजण्यास मदत होत असते.

११. विचारांची देवान घेवान प्रभाविपणे होते.

१२. कार्य लवकर होण्यास मदत होते.


१३. जबाबदारीपूर्वक काम पूर्ण करण्याला प्राधाण्य देता येते.

१४. सकारात्मकतेचा विकास होण्यास मदत होते.

१५. वैचारीक दृष्टीकोन वाढण्यास मदत होईल.

१६. आपलेपणाची भावणा विकसित होईल.

१७. समाजाबद्दलचे आपले कर्तव्य काय आहे ? याची जाणीव होण्यास मदत होईल.



ISSN–2277- 8721
EIIRJ
Electronic International Interdisciplinary Research Journal (EIIRJ)
Volume-X, Issues-III May - June 2021

**सहकार्यात्मक अध्ययनाचे पाच तत्वे :–**

१. सकारात्मक सहभाग :–

अ. ध्येय स्पष्ट असणे आवश्यक.

ब. गटातील प्रत्येकाने वैयक्तीक कष्ट घेणे.

क. गटातील प्रत्येकाने दिलेला शब्द पाळणे जेणे करुन यश प्राप्त होईल.

२. वैयक्तीक व गटाला उत्तरदायीत्व :–

अ. गटातील प्रत्येकाने आपले सहकार्य देणे.

ब. गटातील प्रत्येकाने ध्येय प्राप्त करण्यासाठी प्रयत्न करणे.

३. आंतरव्यक्ती व लहान कुटूंब कौशल्य :–

गटातील प्रत्येक सदस्याला गरजेचे

अ. पेरणादायी बनणे

ब. प्रभावी नेता पुरविणे

क. निर्णय घेण्याची क्षमता विकसित करणे

ड. विश्वास ठेवण्याची क्षमता विकसित करणे.

इ. योग्य संप्रेषण करणे

ई. आत्मविश्वास वाढविणे.

४. समोरासमोर आंतरक्रिया :–

अ. वैयक्तिकरित्या सहकार्य करणे.

ब. कष्ट करण्यासाठी प्रोत्साहीत करणे.

क. समस्या कशी सोडवावी हे स्पष्ट करणे.

ड. दुसऱ्याला समजुन घेणे.

इ. संकल्पने बद्दल चर्चा करणे.

ई. भूतकालीन व वर्तमानकालीन अध्ययनाशी जोडणे.

५. सांघिक प्रक्रिया :–

अ. एकमेकांशी मोकळेपणाने बोलणे.

ब. परिणामकारक संबंध बनवणे.

क. ध्येय प्राप्तीकडे जाण्यासाठी तयार होणे.

सहकार्यात्मक अध्ययनामुळे स्वप्रगती व समाजप्रगती होण्यास मदत होते. सदर सहकार्यात्मक अध्ययन हे प्रकल्प अध्ययनासारखे असते. प्रकल्पात जसे एकत्र काम करुन कोणतेही कार्य पुर्णत्वाला नेता येते तसेच कार्य किंवा काम सहकार्यात्मक अध्ययनात होते. येथे गटातील प्रत्येक सदस्याचा मतांचा आदर करुन विचार करता येतो जबाबदादीची

जाणीव प्रत्येकात निर्माण होण्यास मदत होते. अध्ययनात येणारे अडथळे एकमेकांच्या सहकार्याने दुर केले जातात. शाळोत फक्त एकमार्गी प्रक्रिया शिक्षकाणे न वापरता काही पाठ हे सहकार्यात्मक अध्ययनाच्या पातळीवरपण शिकविण्याचा प्रयत्न करावा जेणे करुन सहकार्याद्वारे विद्यार्थी एकमेकांच्या मदतीने पाठ चांगल्या प्रकारे आत्मसाद करु शकतील. विचार, तर्क, भावना यांना दिशा प्राप्त होईल.

**संदर्भ सूची :—**

१. प्रा. अरुण सांगोलकर ( २०१० ) , नवीन जागतिक समाजातील षिक्षणाचे विचारप्रवाह, इनसाईट पब्लिकेशन, नाषिक

२. https://www.slideshare.net/ahmedabbas1121/cooperative-learning

.